# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः26.09.2025** **वारः शुक्रवार**

---

•बिहारच्या मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेचा आज पंतप्रधानांच्या हस्ते प्रारंभ

•भारत, अन्न आणि कृषी क्षेत्रातील जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्ट-अप परिसंस्था असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन

•बँकांनी सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग क्षेत्राला अर्थसहाय्य करावं – केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांचं आवाहन

आणि

•भारत-पाकिस्तान दरम्यान होणार आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना

**<u>बिहार-मु-महिला-योजना</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दूरस्थ पद्धतीनं बिहारच्या मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेचा शुभारंभ करणार आहेत. या कार्यक्रमात, पंतप्रधान बिहारमधील ७५ लाख महिलांच्या बँक खात्यात प्रत्येकी १० हजार रुपये थेट हस्तांतरित करतील. बिहार सरकारचा हा उपक्रम महिलांना आत्मनिर्भर करणे आणि स्वयंरोजगार आणि उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून महिलांच्या सक्षमीकरणाला प्रोत्साहन देणे हा आहे असं पंतप्रधान कार्यालयानं एका निवेदनात म्हटलं आहे.

**<u>पंतप्रधान-वर्ल्ड-फूड-इंडिया</u>**

जागतिक अन्न सुरक्षेत भारत सातत्यानं  योगदान देत असून गेल्या १० वर्षांत देशातील अन्नधान्याचे उत्पादन वाढलं आहे असं पंतप्रधानांनी काल नवी दिल्लीत आयोजित वर्ल्ड फूड इंडिया २०२५ या कार्यक्रमात सांगितलं. आज भारत अन्न आणि कृषी क्षेत्रातील जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्ट-अप परिसंस्था आहे असंही मोदी यांनी सांगितलं. लहान शेतकऱ्यांच्या संशक्तीकरणासाठी सरकारनं अनेक धोरणे आखली आहेत, गेल्या दहा वर्षांत भारतातील २५ कोटी लोकांनी गरिबीवर मात केली आहे असंही पंतप्रधानांनी अधोरेखित केलं.  चार दिवस चालणाऱ्या

या कार्यक्रमात अन्न प्रक्रिया क्षेत्रातील भारताचा प्रवास या प्रदर्शनात मांडण्यात येणार आहे त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि गुंतवणूकीला प्रोत्साहन देण्यात येईल.

**<u>पीएम-कुसुम</u>**

प्रधानमंत्री कुसुम योजनेअंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल चार राज्यातल्या सौर ऊर्जा प्रकल्पांचं लोकार्पण दूरस्थ पद्धतीनं करण्यात आलं. यामध्ये महाराष्ट्रातल्या दोन हजार 458 मेगावॅट क्षमतेच्या 454 सौर ऊर्जा प्रकल्पांचा समावेश आहे. पंतप्रधानांनी यावेळी सौर ऊर्जा प्रकल्पातील विविध लाभार्थ्यांशी संवादही साधला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देशात सौर उर्जेवर चालणारे कृषीपंप बसवण्यात राज्याचा प्रथम क्रमांक असल्याचं यावेळी सांगितलं.

**<u>अमितशाह</u>**

केंद्राचा 'मेक इन इंडिया अभियानाचा दूसरा टप्पा पुढील २५ वर्षांत जागतिक अर्थव्यवस्थेचा एक मोठा भाग असलेल्या उदयोन्मुख क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करेल असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल एका पुरस्कार सोहळ्यात शाह बोलत होते. बँकांनी सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग क्षेत्राला अर्थसहाय्य करावं असं आवाहन त्यांनी केलं. गेल्या १० वर्षांत गरिबातील गरिबांना बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ५३ कोटी बँक खाती उघडण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<u>इंट्रो-</u>**

सेवा आणि सुशासन या मंत्रानं प्रेरित होऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार परिवर्तन आणि प्रगती साध्य करण्यासाठी अथकपणे कार्यरत आहे. या अनुषंगानं सेवा पर्व या विशेष मालिकेत आज भारताच्या वृद्धिंगत ई-गवर्नन्स परिसंस्थेद्वारे सरकारनं केलेल्या विनासायास, पारदर्शी आणि समावेशक डिजीटल अनुभवाबद्दल जाणून घेऊ...

**<u>स्क्रीप्ट-</u>**

सार्वजनिक सेवांपासून वित्तीय सक्षमीकरणापर्यंत भारताची ई-गवर्नन्स परिसंस्था नागरिकांच्या अनुभवाची व्याख्या बदलत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टिने मार्गदर्शित तंत्रज्ञानामुळे सरकारचा कारभार आता अधिक सहजप्राप्य आणि समावेशक झाला आहे. पंतप्रधान म्हणतात त्याप्रमाणे ई-गवर्नन्स सुलभ, परिणामकारक, परवडणारा आणि पर्यावरणपूरक अनुभव बनला आहे...

जन धन, आधार आणि मोबाईल ही त्रिवेणी भारताच्या सु-विकसित डिजीटल व्यवस्थेची गुरुकिल्ली बनली आहे. थेट लाभ हस्तांतरासाठी या त्रिवेणीचा वापर करुन सरकारी लाभ, सबसिडी आणि रक्कम थेट लाभार्थ्यांच्या खात्यात पाठवली जाते. ई-केवायसीमुळे आधार-आधारित पडताळणी तत्काळ, कागद-विरहित तसंच घोटाळामुक्त पद्धतीनं होते. सरकारी ई-मार्केट म्हणजेच जेमने खरेदीत क्रांति आणली आहे, तसंच लक्षावधी लघु व्यवसाय, महिला उद्योजक आणि स्टार्टअप्स यांची भरभराट होत आहे. उमंग ऍप सरकारी सेवा घेण्यासाठी एकमेव मंच आहे, डिजीलॉकरमध्ये डिजीटल कागदपत्रं साठवता येतात, भाषिणीमुळे भाषांदरम्यान संवाद साधता येतो आणि आयगॉट कर्मयोगी एक मुख्य डिजीटल शिक्षण मंच आहे. सरकार आणि जनता यांच्या दरम्यान तंत्रज्ञान एक पुल बनले आहे. या सर्व मंचांमुळे कारभार आता काऊंटर्सवर आणि व्हरांड्यात सीमित न राहता, डिजीटल, समावेशक आणि पारदर्शी पद्धतीने भारताच्या प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचत आहे.

**<u>संरक्षण-विमाने</u>**

संरक्षण मंत्रालयानं हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड या कंपनीबरोबर भारतीय हवाई दलासाठी ९७ हलक्या लढाऊ विमानांच्या खरेदीसाठी ६२ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीचा करार केला आहे. यामुळे देशांतर्गत हवाई क्षेत्रामधील परिसंस्थेला मोठी चालना मिळेल आणि येत्या सहा वर्षांत दरवर्षी ११ हजारांहून अधिक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील अशी अपेक्षा आहे. या विमानात ६४ टक्क्यांहून अधिक स्वदेशी सामग्री वापरली जाणार आहे.

**<u>झेलेन्स्कीनिवेदन</u>**

रशियाविरुद्ध सुरू असलेलं युद्ध संपल्यानंतर पदावरून पायउतार होण्यास आपण तयार असल्याचं युक्रेनचे अध्यक्ष वोल्दोमिर झेलेन्स्की यांनी म्हटलं आहे. अमेरिकेतल्या खासगी माध्यमाला दिलेल्या मुलाखतीत झेलेन्स्की यांनी युद्ध थांबल्यास आपण निवडणूक लढवणार नसल्याचं सांगितलं. युद्ध सुरू असेपर्यंत युक्रेनला मदत करणं आणि ते संपुष्टात आणणं हे आपलं एकमेव उद्दीष्ट आहे, असं ते म्हणाले. युद्धबंदी झाली तर, आपण संसदेला निवडणुका घेण्याची विनंती करू असंही त्यांनी सांगितलं.

**<u>नेपाळ-पंतप्रधान</u>**

नेपाळच्या हंगामी पंतप्रधान सुशीला कार्की यांनी काल प्रथमच राष्ट्राला संबोधित केलं. आपलं सरकार सुशासन आणि जलद सार्वजनिक सेवा प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहे आणि ५ मार्च रोजी मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका घेणे हे आपल्या सरकारचं मुख्य उद्दिष्ट असल्याचं त्या म्हणाल्या. पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ कार्यालयासह सर्व सरकारी कार्यालयांमध्ये नागरिकांसाठी हॉट लाइन सेवा सुरू करण्यात आल्या असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>ट्रंपशुल्क</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयात केलेल्या ब्रँडेड औषधांवर १०० टक्के कर लावण्याची घोषणा केली आहे. बाहेरील उत्पादनांचा ओघ रोखण्यासाठी मोठ्या ट्रक्सवर 25 टक्के कर लावणार असल्याची तसंच स्वयंपाक घर आणि न्हाणी घरातील कपाटांवर ५० टक्के कर लावणार असल्याची घोषणाही ट्रंप यांनी केली. काही विशिष्ठ प्रकारच्या फर्निचरवरही पुढील आठवड्यापासून ३० टक्के कर लावला जाणार आहे. अमेरिकन व्यवसाय आणि चेंबर ऑफ कॉमर्स यांच्या कडून तीव्र विरोध असूनही, अमेरीकेतील नोकऱ्या आणि उद्योगाला चालना देण्यासाठी ही पावले उचलली असल्याचा ट्रंप यांचा दावा आहे.

**<u>जयशंकर-पूल-मंजिरी</u>**

जगभरात सध्या अनिश्चिततेचा काळ असताना स्वावलंबन, तंत्रज्ञान, बहुध्रुवीयता आणि ग्लोबल साऊथमधील देशातील परस्पर सहकार्य या गोष्टींकडे लक्ष देऊन परस्परांना बळकट करण्याची गरज परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी व्यक्त केली. न्यूयॉर्क इथं काल वार्षिक ओआरएफ चर्चेत ते बोलत होते. सध्याच्या स्थितीत निर्माण झालेल्या गरजांचं निराकरण करण्यासाठी जागतिक कार्यबल तयार होण्याची गरज जयशंकर यांनी व्यक्त केली.

**<u>सोनम-वांगचुक-पूल-संध्या</u>**

गृह मंत्रालयाने सोनम वांगचुक यांच्या एनजीओ चं एफ.सी.आर.ए. प्रमाणपत्र रद्द केलं आहे. वांगचुक यांनी वर्ष २०२१-२२ मध्ये परकीय योगदान नियमन कायद्याचं उल्लंघन करून संस्थेच्या खात्यात साडेतीन लाख रुपये जमा केले होते तसंच काही शैक्षणिक कार्यक्रमांसाठी स्वीडिश देणगीदाराकडून सुमारे ४ लाख ९३ हजार रुपये देखील स्वीकारले होते. देशाच्या सार्वभौमत्वविषयक अभ्यासासाठी परदेशी योगदान स्वीकारता येणार नाही आणि हे कृत्य देशाच्या राष्ट्रीय हिताच्या विरुद्ध आहे असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>SAFF-U17-पूल-मंजिरी</u>**

श्रीलंकेत कोलंबो इथं १७ वर्षांखालील पुरुषांच्या SAFF फुटबॉल विजेतेपद स्पर्धेच्या उपान्त्यफेरीतील सामन्यात भारतानं काल नेपाळवर 3-0 असा विजय मिळवला. त्यामुळे भारत अंतिम फेरीत पोहोचला आहे. स्पर्धेच्या विजेतेपदासाठी भारताची बांगलादेशशी लढत होईल.

पॅरा आर्चरी-पूल मंजिरी

दक्षिण कोरियातल्या ग्वांग्जू इथं दिव्यांगांच्या जागतिक तिरंदाजी विजेतेपदाच्या स्पर्धेत भारतानं किमान तीन पदकं निश्चित केली आहेत. भारताचे तीन तिरंदाज सुवर्णपदकासाठी लढत देणार आहे.

**क्रिकेट-चिंचोळकर**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या सुपर फोर फेरीत कालपाकिस्ताननं बांगलादेशचा १४ धावांनी पराभव करतअंतिमफेरी गाठली. प्रथम फलंदाजी करताना पाकिस्ताननं २०षटकांत ८ बाद १३५ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखलबांगलादेशचा संघ १२४ धावा करू शकला. अंतिम सामनाभारत आणि पाकिस्तान यांच्यात परवा २८ तारखेला खेळलाजाईल.दरम्यान, अंतिम फेरीपूर्वीच्या आणखी एका सुपर फोर सामन्यात, आज दुबईमध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यात सामना होणार आहे.

**हवामान**

बंगालच्या उपसागरावर तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळं महाराष्ट्रात विविध भागांमध्ये आजपासून तीन दिवस ढगाळ हवामान असेल आणि पावसातही वाढ होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

शेवटी पुन्हा ठळक बातम्या

बिहारच्या मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेचा आज पंतप्रधानांच्या हस्ते प्रारंभ

भारत, अन्न आणि कृषी क्षेत्रातील जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्ट-अप परिसंस्था असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन

बँकांनी सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग क्षेत्राला अर्थसहाय्य करावं – केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांचं आवाहन

आणि

भारत-पाकिस्तान दरम्यान होणार आशिया करंडक क्रिकेटचा अंतिम सामना

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार**